जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JAN 2019
पुण्यनगरी

# संशोधनात संयुक्त प्रकल्पांची गरज

## डॉ. पी. पी. वडगावकर : शिवाजी विद्यापीठाचा 'सीएसआयआर-एनसीएल'शी करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्रयोगशाळेत संशोधकाने एकट्याने संशोधन करण्याचे दिवस आता मागे पडले असून उत्कृष्ट संशोधन कार्यासाठी विविध संस्थांनी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्या दरम्यानचा सामंजस्य करार दोन्ही संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) मुख्य शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर यांनी व्यक्त केला.


शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्यात संशोधनविषयक सहकार्याचा सामंजस्य करार झाला, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. पी. पी. वडगावकर म्हणाले, उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी आपापल्या संशोधन क्षेत्राची माहिती एकमेकांना दिली पाहिजे. त्यातून संशोधनाच्या नवनव्या संधी सामोऱ्या येतील. केवळ पायाभूत सुविधाच नव्हेत, तर मानवी स्नेहबंधही अशा संयुक्त प्रकल्पांमधून वाढीस लागतात, हे अशा करारांचे महत्त्वाचे फलित असते. यावेळी डॉ. वडगावकर यांनी आपणही शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे १९७९ च्या बॅचचे विद्यार्थी असल्याचा अभिमानपूर्वक उल्लेख केला.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, आपल्या संशोधनाचे पेटंट मिळवण्याच्या कामी एनसीएलच्या अनुभवी संशोधकांचे मार्गदर्शन विद्यापीठाच्या संशोधकांना लाभेल. त्याचप्रमाणे संशोधनाचे तंत्रज्ञानात रूपांतरण आणि औद्योगिक साहचर्य वृद्धी या दृष्टीनेही त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी, तर एनसीएलच्या वतीने डॉ. वडगावकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व पुणे येथील सीएसआयआर-एनसीएल यांच्यातील कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एनसीएलचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर व इतर मान्यवर.**

19 JAN 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्पांची गरज

## पी.पी.वडगावकर : विद्यापीठ व सीएसआयआर-एनसीएल या संस्थेत करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रयोगशाळेत एकट्याने संशोधन करण्याचे दिवस संपले आहेत. उत्कृष्ट संशोधनासाठी विविध संस्थांनी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्या दरम्यानचा सामंजस्य करार दोन्ही संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) मुख्य शास्त्रज्ञ डॉ. पी.पी. वडगावकर यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्यात संशोधनविषयक सहकार्याचा सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. वडगावकर म्हणाले, उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेणे



आज आवश्यक झाले आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी, तेथील संशोधकांनी एकत्र येऊन एकमेकांशी चांगला परिचय करून घेतला पाहिजे. संशोधन क्षेत्राची माहिती एकमेकांना दिली पाहिजे. त्यातून संशोधनाच्या नवनव्या संधी समोर येतील. यामध्ये आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्पांचेही महत्त्व वाढले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या सामंजस्य करारामुळे संशोधन, संयुक्त प्रकल्प, प्रयोगशाळा सहकार्याविषयी एनसीएलबरोबर संवाद आणि साहचर्य वाढेल. संशोधनाचे पेटंट मिळवण्याच्या कामी एनसीएलच्या अनुभवी संशोधकांचे मार्गदर्शन विद्यापीठाच्या संशोधकांना लाभेल. संशोधनाचे तंत्रज्ञानात रुपांतरण आणि औद्योगिक साहचर्य वृद्धी या दृष्टीनेही त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी, तर एनसीएलच्या वतीने डॉ. वडगावकर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा शुक्रवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी १६१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

दूरशिक्षण केंद्रातील बी. कॉम., एम. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास) भाग एक, सत्र एकची परीक्षा शुक्रवारपासून २१ अभ्यास केंद्रांवर सुरु झाली. पहिल्या दिवशी सकाळी साडेदहा ते दुपारी दीड या वेळेत १६१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सोमवार (दि. २१) पासून सकाळी साडेदहा ते दुपारी दीड आणि दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच परीक्षा होणार आहे. परीक्षा शुक्रवार (दि. २५) पर्यंत चालणार आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली.

Hello Kolhapur
Page No. 5 Jan 19, 2019
Powered by: erelego.com

# दूरशिक्षण केंद्र परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्र परीक्षा शुक्रवारपासून सुरू झाली. एकूण २१ अभ्यास केंद्रांवर १६१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. शुक्रवारी सकाळी साडेदहा ते दीड या कालावधीत पेपर होता. सोमवार (दि. २१) पासून सकाळी व दुपारी अशा दोन सत्रांत परीक्षा होणार आहे.

लोकमत

# राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे यश

**कोल्हापूर :** अमृतसर (पंजाब) येथील गुरुनानक विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय विद्यापीठीय तलवारबाजी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने यश मिळविले.

यात शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करताना श्रीया जाधव (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज) हिने सेबर प्रकारात, तर ज्योती सुतार (न्यू कॉलेज, कोल्हापूर) हिने फॉईल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. तिला प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, प्रा. सुधाकर कुमकर यांचे मार्गदर्शन, तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

Hello Kolhapur
Page No. 6 Jan 19, 2019
Powered by: erelego.com